| MHSN10-000368-2023 | **फौजदारी किरकोळ अर्ज क्र.७८/२०२३**<br>**(सुवर्णा लक्ष्मण कुराडे विरुध्द लक्ष्मण हणमंत कुराडे व इतर)** |
| --- | --- |

## अर्ज निशाणी क्र.५ वर आदेश

१. अर्जदाराने प्रस्तुत अर्ज घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ चे कलम २३ अन्वये अंतरिम अन्नवस्त्र खर्च जाबदार क्र.१ यांचेकडून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदाराने असे कथन केले आहे की, अर्जदार क्र.१ यांचे पहिले लग्न अंबादास विटकर यांच्या सोबत झाले होते. प्रथम विवाहापासुन अर्जदार क्र.१ यांना एक मुलगी आहे. त्यानंतर अर्जदार क्र.१ यांचे अंबादास विटकर यांच्या पासुन घटस्फोट झाला आहे. अर्जदार व जाबदार क्र.१ यांचा विवाह दि.२९.०४.२०१८ रोजी मारुती मंदिर, बजरंग नगर, विटा, ता.खानापूर, जि.सांगली येथे झाला. जाबदार क्र.२ अर्जदार क्र.१ यांची सासु व जाबदार क्र.३ अर्जदार क्र.१ यांची सवत आहे. जाबदार क्र.३ ही जाबदार क्र.१ यांची पहिली पत्नी आहे. अर्जदार क्र.१ सोबत लग्न करते वेळेस जाबदार क्र.१ यांनी असे सांगितले होते की, जाबदार क्र.१ व जाबदार क्र.३ यांचा घटस्फोट झालेला आहे व त्यांचे तिन्ही मुले जाबदार क्र.१ सोबत राहतात. अर्जदार क्र.१ यांचे जाबदार क्र.१ सोबत लग्न झाल्यानंतर अर्जदाराला कळाले की, जाबदार क्र.१ व जाबदार क्र.३ यांचा घटस्फोट झालेला नाही. जाबदार क्र.१ हे जाबदार क्र.३ यांच्या सांगण्यावरुन अर्जदार क्र.१ यांना शिवीगाळ मारहाण करीत होते. जाबदार हे अर्जदार क्र.१ ला उपाशी ठेवत होते व घरातील सर्व कामे अर्जदाराकडून करुन घेत होते. जाबदार क्र.१ यांनी अर्जदार क्र.१ यांना फसवुन त्यांच्याशी लग्न करुन घेतले, परंतु अर्जदाराला कधीही पत्नीचा

मानपान व दर्जा दिलेला नाही.

३. दि. २१.०९.२०२० रोजी अर्जदार क्र.१ यांना जाबदार क्र.१ यांच्या पासुन मुलगी साक्षी लक्ष्मण कुराडे (अर्जदार क्र.२) झाली. जाबदार क्र.१ यांनी अर्जदारांच्या दैनंदिन गजरांसाठी कोणतीही आर्थिक मदत केली नाही. माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये जाबदार क्र.१ यांनी अर्जदार क्र.१ यांना हाताने व लाथा–बुक्यांनी मारहाण केली. जाबदारानी अर्जदारांना "जर घरातील, शेतातील काम करता आले नाही तर तुला काय घरात आयते ठेवू का?, घरात राहायचे नाही" असे म्हणुन घरातून हाकलुन दिले. अर्जदार क्र.१ हे अर्जदार क्र.२ सोबत माहे एप्रिल २०२३ पासुन विटा येथे रक्कम रु.३०००/– प्रति माह भाड्याने राहत आहेत.

४. जाबदाराने अर्जदारांच्या उदरनिर्वाहासाठी कोणतीही व्यवस्था केली नाही. अर्जदाराकडे उत्पन्नाचे साधन नाही. याउलट, जाबदार क्र.१ हे रस्त्याचे बांधकामाचे कंत्राटदार आहेत. सदरील व्यवसायातून जाबदार क्र.१ यांना दरमहा ५०,०००/– ते ६०,०००/– उत्पन्न मिळते. जाबदार क्र.१ याची आटपाडी येथे दोन घरे आहेत. त्यापैकी एक आर.सी.सी. बंगला आहे. जाबदार क्र.१ यांच्याकडे पाच ते सात एकर बागायत शेती आहे व त्यामध्ये डाळींबाची बाग आहे. सदर जमिनीतून चार ते पाच लाख रुपये इतके वार्षिक उत्पन्न मिळते. तसेच, जाबदार यांच्याकडे दुबत्या म्हशी, गाई, शेळ्या आहेत. त्यापासुन महिन्याला १० ते १५ हजार इतके उत्पन्न मिळते. अर्जदारांनी अर्जदार क्र.१ व २ यांच्यासाठी प्रत्येकी ५,०००/– रुपये दरमहा अंतरिम अन्नवस्त्र खर्चाची मागणी केली आहे.

५. जाबदार क्र.१ व ३ यांनी त्यांचे लेखी म्हणणे निशाणी १० येथे सादर केले. जाबदार क्र.१ यांनी अर्जदारांसोबत त्यांचे नाते नाकारले आहे. जाबदार क्र.१ यांनी असे कथन केले आहे की, अर्जदार क्र.१ सोबत त्यांचा विवाह कधीही झालेला नाही. अर्जदार क्र.२ ही जाबदार क्र.१ यांची मुलगी नाही. अर्जदारांचा अर्ज खोटा व

लबाडीचा आहे. त्यांनी अर्जदार विरुध्द कौटुंबिक हिंसाचार केल्याचे अमान्य केले. त्यांनी असे कथन केले आहे की, अर्जदार क्र.१ ही तिच्या मामाच्या गावी आटपाडी येथे आली असताना जाबदार क्र.१ यांचे तिच्या मामाच्या घरी जाणे–येणे होते. अर्जदार क्र.१ हिने जाबदार क्र.१ वर बळजबरी केली व जाबदारास तु माझ्याशी संबंध नाही ठेवले तर मी तुझ्यावर केस करुन तुला अडकवीण अशी धमकी दिली. अर्जदार क्र.१ ही जाबदार क्र.१ चे शारीरिक शोषण करीत होती. अर्जदार क्र.१ हिचे तीन लग्न झालेली आहेत. अर्जदार क्र.१ जाबदार क्र.१ याला ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न करीत होती. अर्जदार क्र.१ हिने जाबदार क्र.१ याला असे सांगितले की, तुझ्या पासुन मी गरोदर राहिलेली आहे. तु मुलगी स्वीकारली नाहीस तर तुझ्यावर मी लैगिक शोषण केले म्हणुन केस घालीन.

६. जाबदार यांनी असे कथन केले की, जाबदार क्र.३ ही जाबदार क्र.१ यांची पत्नी आहे व त्यांना मुले आहेत. जाबदारांना कोणत्याही प्रकारची शेती नाही व त्यांच्याकडे जनावरे नाहीत. जाबदार क्र.१ यांना कोणत्याही प्रकारचा कामधंदा नाही व उत्पन्नाचे साधन नाही. जाबदार क्र.१ बिगारीचे काम असेल त्यावेळी कामावर जात असतो. जाबदार व अर्जदार यांचे दरम्यान कोणतेही नाते नाही म्हणुन अर्जदारांना कोणत्याही प्रकारची पोटगी देणे लागत नाही. जाबदारांनी प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

७. अर्जदार व जाबदार यांचे विद्वान विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले.

८. जाबदार क्र.१ यांनी त्यांचे अर्जदार क्र.१ सोबत लग्न झाल्याचे नाकारले आहे. जाबदार क्र.१ यांनी असे कथन केले आहे की,अर्जदार क्र.१ हिने जाबदार क्र.१ वर बळजबरी केली व जाबदारास तु माझ्याशी संबंध नाही ठेवले तर मी तुझ्यावर केस करुन तुला अडकवीण अशी धमकी दिली. अर्जदार क्र.१ ही जाबदार

क्र.१ चे शारीरिक शोषण करीत होती. अर्जदार क्र.१ यांनी जाबदार क्र.१ यांच्यावर जबरदस्ती करुन जाबदार क्र.१ यांचे लैगीक शोषण केल्याबाबत जाबदार क्र.१ यांनी कोठेही तक्रार केलेली नाही. जाबदार क्र.१ यांच्या उपरोक्त वर्तणुकीवरुन अर्जदार क्र.१ यांनी जाबदार क्र.१ यांचे जबरदस्तीने लैंगीक शोषण केल्याचे कथन स्वीकारार्ह वाटत नाही. याव्यतिरिक्त निशाणी १७ वर दाखल अर्जदार क्र.२ यांचे जन्म प्रमाणपत्रावरुन ही बाब प्रथमदर्शनी सिध्द होते की, जाबदार क्र.१ हे अर्जदार क्र.२ यांचे वडील आहेत. सदरील जन्म प्रमाणपत्रामध्ये अर्जदार क्र.१ यांचे नाव अर्जदार क्र.२ यांची आई म्हणुन नमुद आहे. उपरोक्त कारणांवरुन ही बाब प्रथमदर्शनी सिध्द होते की, अर्जदार क्र.१ व जाबदार क्र.१ यांच्या दरम्यान विवाहस्वरुपी संबंध (Relationship in the nature of marriage) आहेत तसेच जाबदार क्र.१ हे अर्जदार क्र.२ यांचे वडील आहेत.

९. अर्जदाराने अर्जामध्ये स्पष्ट सांगितले आहे की, जाबदार क्र.१ यांनी अर्जदाराला शिवीगाळ व मारहाण केली तसेच अर्जदारांच्या उदरनिर्वाहासाठी कोणतेही आर्थिक सहाय्य केले नाही. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जाचे पृष्ठ्यर्थ त्यांचे प्रतिज्ञापत्र निशाणी ६ येथे सादर केले आहे. अर्ज निशाणी ५, प्रतिज्ञापत्र निशाणी ६ व कौटुंबिक घटना अहवाल दि.१५.०५.२०२३ वरुन ही बाब प्रथमदर्शनी दिसून येते की, जाबदार क्र.१ यांनी अर्जदाराविरुध्द कौटुंबिक हिंसाचार केला आहे.

१०. अर्जदारांना अन्नवस्त्र खर्च देण्याची प्राथमिक जबाबदारी जाबदार क्र.१ यांची आहे. जाबदार क्र.१ यांच्या मिळकतीबाबत अर्जदाराने कुठलाही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. फेरिस्त निशाणी १४ सोबत दाखल सातबारा उता–यावरुन ही बाब प्रथमदर्शनी सिध्द होते की, जाबदार क्र.२ दुर्गाबाई यांच्या नावावर आटपाडी येथे १ हेक्टर ४८ आर जमिन आहे.

११. मा.सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिर्णय ***रजनेश विरुध्द नेहा २०२१ एस.सी.सी ३२४*** मधील निर्देशाप्रमाणे जाबदार यांनी त्यांच्या मिळकती व

दायित्वाबाबत प्रतिज्ञापत्र सादर केले नाही. यावरुन ही बाब स्पष्ट होते की, जाबदार क्र.१ यांनी त्यांच्या मिळकती जाणीवपूर्वक व हेतुतः लपवुन ठेवल्या आहेत. अर्जदार यांनी **निशाणी १२** वर त्यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यामध्ये उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याचे अर्जदाराने शपथेवर सांगितले आहे. फेरिस्त निशाणी १४ सोबत दाखल करारपत्र दि.१८.०४.२०२३ वरुन ही बाब प्रथमदर्शनी सिध्द होते की, अर्जदार क्र.१ यांनी विटा येथे घर भाडेतत्वावर घेतले आहे व त्याचे भाडे दरमहा ३०००/– रुपये आहे.

**१२.** जाबदार क्र.१ याने अर्जदारांना अन्नवस्त्र खर्च दिल्याचे त्यांच्या लेखी म्हणण्यामध्ये सांगितलेले नाही. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ कलम ३ प्रमाणे आर्थिक संसाधनपासून पिडीत व्यक्तीला वंचित ठेवणे 'घरगुती हिंसाचार' च्या व्याख्येत मोडते.

**१३.** जाबदार क्र.१ ने त्यांचे लेखी म्हणणेमध्ये असे मान्य केले आहे की, ते बिगारीचे काम करतात. यावरुन ही बाब प्रथमदर्शनी सिध्द होते की, जाबदार क्र.१ यांच्याकडे उत्पन्नाचे साधन आहे. अभिलेखावर सादर सातबारा उता–यावरुन ही बाब सिध्द होते की, जाबदार क्र.२ यांच्याकडे शेत जमीन असल्यामुळे त्यांच्या उदरनिर्वाहासाठी त्या जाबदार क्र.१ वर अवलंबुन नाही. अर्जदार व जाबदार यांचे राहणीमान व अर्जदार यांचे उदरनिर्वाह खर्च, घराचे भाडे दरमहा ३०००/– रुपये तसेच, वाढत्या महागाईचा विचार केला असता अर्जदारांना समाईकरित्या जाबदार क्र.१ यांच्याकडून दरमहा रक्कम रु.६०००/–(रुपये सहा हजार मात्र) प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासून मंजूर करणे न्यायोचित होईल.

**१४.** उपरोक्त कारणमिमांसेवरुन अर्ज अंशतः मंजूर करण्या योग्य आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आ दे श</u>

**अ**. अंतरिम अर्ज निशाणी क्र.५ खर्चासह अंशतः मंजूर करण्यात येते.

**ब**. जाबदार क्र.१ यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अर्जदारांना समाईकरित्या अंतरिम अन्नवस्त्र खर्च रक्कम रु.६०००/- (रुपये सहा हजार मात्र) दरमहा अंतरिम अर्जाच्या दिनांकापासून म्हणजेच दि.१७.०४.२०२३ रोजीपासून मूळ अर्जावर न्यायनिर्णय होईपर्यंत द्यावे.

**क.** जाबदार क्र.१ यांनी अर्जदारांना प्रस्तुत अर्जाचे खर्च रक्कम रु.१०००/- द्यावे.

-

Sd/-

**दिनांक - ०४.११.२०२३.** **(रफीक अ. शेख)**

**ठिकाण - विटा.** **३ रे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, विटा.**